तरुण भारत शनिवार, ३ ऑक्टोबर २०१५

# छायाचित्रांतून बापूंचा 'महात्मा'पर्यंतचा प्रवास

## विद्यापीठातील 'गांधी इन साऊथ आफ्रिका' छायाचित्र व ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

दक्षिण आफ्रिकेतील गांधी या दुर्मीळ छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या व्यक्तिमत्त्वाचा महात्मा गांधी होण्यापर्यंतच्या प्रक्रियेचा वेध घेता येऊ शकतो, असे मत शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या 'गांधी इन साऊथ आफ्रिका' या छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : 'गांधी इन साऊथ आफ्रिका' या दुर्मीळ छायाचित्रांची पाहणी करताना बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, महेश काकडे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. भारती पाटील आदी.

विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीतील आबालाल रेहमान आर्ट गॅलरीमध्ये गांधी अभ्यास केंद्र व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ह्या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी. व्ही. मुळे, डॉ. आर. बी. पाटील, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदर्शनात महात्मा गांधी यांची दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यादरम्यानची सुमारे ३० अत्यंत दुर्मीळ छायाचित्रे त्यांच्या माहितीसह प्रदर्शित करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे महात्मा गांधी यांच्या संदर्भातील सुमारे १०० निवडक ग्रंथही प्रदर्शित करण्यात आले आहेत. येत्या ९ ऑक्टोबरपर्यंत सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहापर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.